GREENPEACE
ग्रीनपीस

**प्रसिद्धी पत्रक**

# जंगलांच्या रक्षणासाठी जनजागृती: ग्रीनपीसची जंगलिस्तान मोहीम

## जंगलांतील कोळशाच्या खाणींविरोधात सरकारला आव्हान

**मुंबई, २२ नोव्हेंबर २०११ :** कोळशाच्या खाणींसाठी जंगले नष्ट करण्याच्या भूमिकेविरोधातील आंदोलनास जनतेचा पाठिंबा मिळवण्यासाठी ग्रीनपीसने आज रिपब्लिक ऑफ जंगलिस्तान या काल्पनिक मोहिमेची सुरूवात आझाद मैदान या दूतावासापासून केली. भालू आणि शेरू या जंगलिस्तानच्या धोका निर्माण झालेल्या नागरिकांनी लोकांना काल्पनिक नागरिकत्व आणि पासपोर्ट दिले आणि वेगाने नष्ट होणारी जंगले तसेच जैववैविध्याच्या रक्षणासाठी जनतेला मदतीचे आवाहन केले.

भारतात कोळशाच्या खाणी आणि कोळशाचा वापर आवश्यक असलेली औष्णिक विद्युत केंद्रे अत्यंत वेगाने निर्माण होत आहेत. हे प्रस्तावित मोठे औष्णिक विद्युत प्रकल्प आणि नव्याने येऊ घातलेल्या कोळशाच्या खाणी मोठ्या प्रमाणात मध्य भारतात- मध्य प्रदेश, छत्तीसगढ, झारखंड आणि ओरिसा तसेच पूर्व महाराष्ट्रातील काही भागांमध्येच निर्माण होणार आहेत.

याशिवाय २००७ सालापासून तब्बल २६,००० हेक्टर वनजमीन कोळशाच्या खाणींसाठी देण्यात आली असून त्यामुळे देशातील जंगलांच्या संपदेला मोठाच धोका निर्माण झाला आहे. जंगले केवळ तेथील प्राण्यांसाठी किंवा जंगलांवर आधारित लोकांसाठी महत्त्वाची नाहीत तर ती शहरांसाठीही त्यांचे पाण्याचे प्रमाण ठरवणे तसेच शहरांची फुफ्फुसे म्हणून आवश्यक ठरतात.

कोल इंडिया लिमिटेडकडे २००,००० हेक्टर जमीन असून त्यातील ५५,००० हेक्टर वनजमीन आहे. त्यामुळे जंगलातील जमिनी न दिल्यामुळे भारतातील वीजनिर्मितीला मोठा फटका बसला असल्याचा त्यांचा दावा चुकीचा आहे. खाणींसाठी जास्त जमिनी देण्याचा मंत्रालयाचा आग्रह हा जमिनी घशात घालण्याचा प्रयत्न असून त्यामुळे आपल्या जंगलांना, त्यातील वाघ, हत्ती, अस्वलांना, त्यातील जैववैविध्याला आणि जंगलातील लोकांच्या आयुष्याला मोठाच धोका पोहोचणार आहे. आपल्या जंगलांच्या रक्षणासाठी आम्ही लोकांना जंगलिस्तानमध्ये सहभागी होण्याचे आवाहन करीत आहोत, असे ग्रीनपीस इंडियाच्या जनसहभाग कार्यकर्त्या उषा सक्सेना यांनी सांगितले.

अधिक स्वच्छ आणि जास्त काळापर्यंत निर्मिती करता येण्याजोगे पर्यायी ऊर्जास्त्रोत उपलब्ध आहेत. भारताला हे ऊर्जेचे मार्ग निवडून पर्यावरणही सुरक्षित राखणे आवश्यक आहे.

लोकांचा पाठिंबा मिळवण्यासाठी देशभरातील शहरांमध्ये प्रत्यक्ष आणि ऑनलाइन अशा दोन्ही पद्धतीने नोंदणी केली जाईल. ही मोहीम दिल्ली, मुंबई आणि चेन्नई या तीन शहरांमध्ये एकाच वेळी सुरू करण्यात येणार असून पुढील आठवड्यात बंगळुरू आणि चंद्रपूर येथेही पोहोचेल. शेरू आणि भालू हे जंगलिस्तानचे शुभंकर दिल्लीमध्ये फिरून लोकांचा पाठिंबा आणि जंगलीस्तानसाठी सदस्य मिळवण्याचा तसेच त्यांच्या निवासाला निर्माण झालेल्या धोक्याबद्दल जनजागृती करण्याचा प्रयत्न करणार आहेत.

भारताच्या प्रथम नागरिक राष्ट्रपती श्रीमती प्रतिभा देवीसिंह पाटील यांना बालदिनाच्या दिवशी लहान मुलांच्या हस्ते पहिला पासपोर्ट देण्यात आला.

अधिक माहितीसाठी संपर्क साधा :


- होझेफा मर्चंट, मीडिया ऑफिसर, ग्रीनपीस इंडिया 9819592410, hozefa.merchant@greenpeace.org
- देवेन दिगवाल, पब्लिक एन्गेजमेंट कॅम्पेनर, ग्रीनपीस इंडिया, 9833596174, deven.digwal@greenpeace.org